RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ११(२)] बुधवार, जानेवारी १८, २०१७/पौष २८, शके १९३८ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक २६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१.—** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. . . . . . . . . . पृष्ठे १-५

दिनांक १७ जानेवारी २०१७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रकाश हिं. माळी,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक १८ जानेवारी २०१७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९६६ चा महा. ४१. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या सदुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (पाचवी सुधारणा) अधिनियम, २०१६ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

१९६६ चा महा. ४१. **२.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त संहिता " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३५ मध्ये,— सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ३५ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (२) मधील " त्याच्या आकारणीच्या चोवीस पटींपेक्षा अधिक नसेल अशा किंमतीस " या मजकुराऐवजी, " त्याच्या आकारणीच्या चोवीस पटींपेक्षा अधिक नसेल अशा किंमतीस किंवा विहित करण्यात येईल अशा रकमेएवढ्या किंमतीस, यांपैकी जी किंमत अधिक असेल त्या किमतीस " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (४) मध्ये, " आकारणीच्या तीन पटीच्या बरोबरीची रक्कम " या मजकुराऐवजी, " आकारणीच्या तिपटीइतकी रक्कम किंवा विहित करण्यात येईल अशी रक्कम, यांपैकी जी रक्कम अधिक असेल ती रक्कम " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४४ ची सुधारणा.

**३.** उक्त संहितेच्या कलम ४४ मधील, पोट-कलम (५) मध्ये, " जिल्हाधिकारी यासंबंधी करण्यात आलेल्या नियमास अधीन राहून निदेश देईल त्याप्रमाणे पाचशे रुपयांहून अधिक नसेल असा दंड " या मजकुराऐवजी, " जिल्हाधिकारी निदेश देईल त्याप्रमाणे, पाचशे रुपयांहून अधिक नसेल किंवा विहित करण्यात येईल अशी रक्कम यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतका दंड " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४४अ ची सुधारणा.

**४.** उक्त संहितेच्या कलम ४४अ मध्ये,—

(क) पोट-कलम (३) मधील, खंड (अ) च्या उप-खंड (एक) मध्ये, " जिल्हाधिकारी, यासंबंधात राज्य शासनाने कोणतेही नियम केलेले असल्यास, त्या नियमांस अधीन राहून निदेश देईल त्याप्रमाणे दहा हजार रुपयांपेक्षा अधिक असणार नाही अशी शास्ती भरणे: " या मजकुराऐवजी, " जिल्हाधिकारी निदेश देईल त्याप्रमाणे, दहा हजार रुपयांपेक्षा अधिक असणार नाही अशी किंवा विहित करण्यात येईल अशी रक्कम, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतकी शास्ती भरणे: " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (४) च्या उप-खंड (अ) मध्ये, " पाच हजार रुपयांपेक्षा जास्त नसेल " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " दैनिक शास्ती बसवता येईल " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" पाच हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतकी किंवा विहित करण्यात येईल अशी रक्कम, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतकी आणखी शास्ती आणि उल्लंघन चालू राहील त्या प्रत्येक दिवसाकरिता शंभर रुपयांपेक्षा अधिक नसेल इतकी किंवा विहित करण्यात येईल अशी रक्कम यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतकी दैनिक शास्ती बसवता येईल. ".

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४५ ची सुधारणा.

**५.** उक्त संहितेच्या कलम ४५ मधील, पोट-कलम (२) मध्ये, " अशा इसमावर " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " आणखी शास्ती लादता येईल. " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" अशा व्यक्तीवर अशा उल्लंघनाबद्दल तीनशे रुपयांपेक्षा अधिक नसेल किंवा विहित करण्यात येईल अशी रक्कम, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतकी शास्ती लादता येईल आणि ज्या मुदतीत असे उल्लंघन करणे चालू राहिले असेल, अशा मुदतीतील प्रत्येक दिवसास तीस रुपयांपेक्षा अधिक नसेल किंवा विहित करण्यात येईल अशी रक्कम, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतकी आणखी शास्ती लादता येईल. ".

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४७अ ची सुधारणा.

**६.** उक्त संहितेच्या कलम ४७अ मधील,—

(क) पोट-कलम (२) मध्ये, " पाचपटीइतका " या मजकुराऐवजी, " पाचपटीइतका किंवा विहित करण्यात येईल अशा रकमेइतका, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतका " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (३) मध्ये, " पाचपटीइतका " या मजकुराऐवजी, " पाचपटीइतका किंवा विहित करण्यात येईल अशा रकमेइतका, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतका, " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४९ ची सुधारणा.

**७.** उक्त संहितेच्या कलम ४९ मध्ये,—

(क) पोट-कलम (२) मधील, खंड (चार) च्या उप-खंड (ब) मध्ये, " २५ पैसे या दराने " या मजकुराऐवजी, " पंचवीस पैसे किंवा विहित करण्यात येईल अशा रकमेइतक्या दराने, यांपैकी जो दर अधिक असेल त्या दराने, " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (१०) मध्ये, " शंभर रुपयांहून अधिक नसेल इतक्या " या मजकुराऐवजी, " शंभर रुपयांहून अधिक नसेल इतक्या किंवा विहित करण्यात येईल अशा रकमेइतक्या, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतक्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

८. उक्त संहितेच्या कलम ५० मध्ये,— सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ५० ची सुधारणा.

(क) पोट-कलम (२) मध्ये,—

(एक) " पाच रुपयांहून कमी नसेल, परंतु एक हजार रुपयांहून अधिक नसेल इतका दंड " या मजकुराऐवजी " एक हजार रुपयांइतका किंवा विहित करण्यात येईल एवढी रक्कम, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतका दंड " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) " दोन हजार रुपयांहून अधिक नसेल असा " या मजकुराऐवजी, " दोन हजार रुपयांहून अधिक नसेल इतका किंवा विहित करण्यात येईल एवढी रक्कम, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतका " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) " पन्नास रुपयांहून अधिक नसेल इतकी " या मजकुराऐवजी, " पन्नास रुपये किंवा विहित करण्यात येईल एवढी रक्कम, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतकी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (४) मध्ये,—

(एक) " पंचवीस रुपयांहून अधिक नसेल इतका " या मजकुराऐवजी, " पंचवीस रुपये किंवा विहित करण्यात येईल अशी रक्कम यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतका " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " पन्नास रुपयांहून अधिक नसेल इतका " या मजकुराऐवजी, " पन्नास रुपये किंवा विहित करण्यात येईल अशी रक्कम यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतका " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

९. उक्त संहितेच्या कलम ५१ मध्ये, " पाच पटीहून " हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी " पाच पटीहून किंवा विहित करण्यात येईल अशा पटीहून, यांपैकी जी अधिक असेल इतक्या पटीहून " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ५१ ची सुधारणा.

१०. उक्त संहितेच्या कलम ५३ मधील, पोट-कलम (३) मध्ये, " अशा जमिनीच्या कर आकारणीच्या किंवा भाड्याच्या दुपटीपेक्षा अधिक न होईल इतकी " या मजकुराऐवजी, " अशा जमिनीच्या कर आकारणीच्या किंवा भाड्याच्या दुपटीपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम, किंवा विहित करण्यात येईल अशी रक्कम यांपैकी जी रक्कम अधिक असेल ती " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ५३ ची सुधारणा.

११. उक्त संहितेच्या कलम ७० मधील, परंतुकामध्ये, " फक्त एक रुपया " या मजकुराऐवजी " एक रुपया किंवा विहित करण्यात येईल अशी रक्कम, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतका " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ७० ची सुधारणा.

१२. उक्त संहितेच्या कलम ७२ मधील, पोट-कलम (३) मध्ये, " आकारणीच्या तिप्पटीबरोबरची रक्कम " या मजकुराऐवजी " आकारणीच्या तिप्पटीएवढी किंवा आकारणीच्या विहित करण्यात येईल अशा, पटीएवढी रक्कम, यांपैकी जी रक्कम अधिक असेल ती रक्कम " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ७२ ची सुधारणा.

१३. उक्त संहितेच्या कलम ११० मधील, पोट-कलम (२) मध्ये,— सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ११० ची सुधारणा.

(क) " दहा पैशांहून अधिक नसेल इतक्या " या मजकुराऐवजी " दहा पैशांहून अधिक नसेल इतक्या किंवा विहित करण्यात येईल इतक्या दराने, यांपैकी जो दर अधिक असेल त्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) "पाच पैशांहून अधिक नसेल इतक्या" या मजकुराऐवजी "पाच पैशांहून अधिक नसेल इतक्या किंवा विहित करण्यात येईल इतक्या दराने, यांपैकी जो दर अधिक असेल त्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १२९ ची सुधारणा.

**१४.** उक्त संहितेच्या कलम १२९ मध्ये, "एक रुपया" या मजकुराऐवजी "एक रुपया किंवा विहित करण्यात येईल अशा रकमेइतकी, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतकी" हा मजकूर दाखल करण्यात येईल ; आणि परंतुकामध्ये, "एक रुपयापर्यंत" या मजकुराऐवजी "एक रुपयापर्यंत किंवा विहित करण्यात येईल, एवढ्या रकमेपर्यंत, यापैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १७४ ची सुधारणा.

**१५.** उक्त संहितेच्या कलम १७४ मध्ये, "अशा रीतीने न भरलेल्या रकमेच्या पंचवीस टक्क्यांहून अधिक नसेल इतका" या मजकुराऐवजी, "अशा रीतीने न भरलेल्या रकमेच्या पंचवीस टक्क्यांहून अधिक नसेल इतका किंवा विहित करण्यात येईल अशा रकमेइतका, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतका" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २२९ ची सुधारणा.

**१६.** उक्त संहितेच्या कलम २२९ च्या खंड (क) मध्ये, "पन्नास रुपयांहून अधिक नसेल इतका" या मजकुराऐवजी, "पन्नास रुपयांहून अधिक नसेल एवढ्या किंवा विहित करण्यात येईल अशा रकमेइतका, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतका" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २६६ ची सुधारणा.

**१७.** उक्त संहितेच्या कलम २६६ मधील परंतुकामध्ये,—

(क) "वार्षिक एक रुपयापेक्षा" या मजकुराऐवजी, "वार्षिक एक रुपयापेक्षा किंवा विहित करण्यात येईल अशा रकमेपेक्षा, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेपेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) "आकारणीच्या तीस पटीहून" या मजकुराऐवजी "आकारणीच्या तीस पटीहून किंवा विहित करण्यात येईल अशा रकमेहून, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २६७ ची सुधारणा.

**१८.** उक्त संहितेच्या कलम २६७ मधील पोट-कलम (२) मध्ये "अनुसूची फ मधील कोष्टकात याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या दरांनुसार ठरविलेली" या मजकुरानंतर, "किंवा विहित करण्यात येईल अशा अधिकतम रकमेइतकी, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतकी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २७३ ची सुधारणा.

**१९.** उक्त संहितेच्या कलम २७३ मध्ये,—

(क) "अनुसूची ग मधील कोष्टकानुसार" या मजकुरानंतर, "किंवा विहित करण्यात येईल अशा अधिकतम रकमेनुसार, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेनुसार" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) "पंचवीस पैसे" या मजकुराऐवजी, "पंचवीस पैसे किंवा विहित करण्यात येईल अशा रकमेइतकी, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतकी" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २८९ ची सुधारणा.

**२०.** उक्त संहितेच्या कलम २८९ मध्ये "पाच रुपयांहून अधिक नसेल असा" या मजकुराऐवजी, "पाच रुपये किंवा विहित करण्यात येईल अशा रकमेइतका, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतका" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**२१.** उक्त संहितेच्या कलम २९१ मध्ये, " एकूण दहा रुपयांहून अधिक नसेल अशी त्यास योग्य वाटेल असा " या मजकुराऐवजी, " त्यास योग्य वाटेल अशी एकूण दहा रुपयांहून किंवा विहित करण्यात येईल अशा रकमेहून अधिक नसेल इतकी रक्कम, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेएवढी " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २९१ ची सुधारणा.

**२२.** उक्त संहितेच्या कलम २९८ मध्ये,— सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २९८ ची सुधारणा.

(क) " पराकाष्ठा दहा रुपये " या मजकुराऐवजी, " दहा रुपयांहून अधिक नसेल एवढ्या किंवा विहित करण्यात येईल अशा रकमेइतक्या, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतक्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) " पराकाष्ठा शंभर रुपये " या मजकुराऐवजी, " शंभर रुपयांहून अधिक नसेल एवढ्या किंवा विहित करण्यात येईल अशा रकमेइतक्या, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेइतक्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**२३.** उक्त संहितेच्या कलम ३२४ मध्ये,— सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ३२४ ची सुधारणा.

(क) " शंभर रुपयाचा " या मजकुराऐवजी, " शंभर रुपयाचा किंवा विहित करण्यात येईल अशा रकमेचा, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेचा " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) " पाचशे रुपयांचा " या मजकुराऐवजी, " पाचशे रुपयांचा किंवा विहित करण्यात येईल अशा रकमेचा, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेचा " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**२४.** उक्त संहितेच्या कलम ३२९ च्या पोट-कलम (२) मध्ये, " एक हजार रुपयांहून अधिक नसणाऱ्या " या मजकुराऐवजी, " एक हजार रुपयांहून अधिक नसेल इतक्या किंवा विहित करण्यात येईल इतक्या रकमेएवढ्या, यांपैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेएवढ्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ३२९ ची सुधारणा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG/2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ३, अंक ११(२)] बुधवार, जानेवारी १८, २०१७/पौष २८, शके १९३८ [ पृष्ठे ५ किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक २७

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Land Revenue Code (Fifth Amendment) Act, 2016 (Mah. Act No. XXI of 2017) is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRAKASH H. MALI,
Principal Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XXI OF 2017.

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 18th January 2017.)*

An Act further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966.

Mah. XLI of 1966.

WHEREAS it is expedient further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Sixty-seventh Year of the Republic of India as follows :—

Short title.

**1.** This Act may be called the Maharashtra Land Revenue Code (Fifth Amendment) Act, 2016.

Mah. XLI of 1966.

Amendment of section 35 of Mah. XLI of 1966.

**2.** In section 35 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (hereinafter referred to as "the said Code"),—

(*a*) in sub-section (*2*), for the words "at such price not exceeding twenty-four times the assessment thereof" the words " at such price not exceeding twenty-four times the assessment thereof or such amount as may be prescribed, whichever is higher," shall be substituted ;

(*b*) in sub-section (*4*), for the words "equal to three times the assessment" the words "equal to three times the assessment or such amount as may be prescribed, whichever is higher," shall be substituted.

Amendment of section 44 of Mah. XLI of 1966.

**3.** In section 44 of the said Code, in sub-section (*5*), for the words "such fine as the Collector may, subject to rules made in this behalf direct not exceeding five hundred rupees" the words "such fine not exceeding five hundred rupees or such amount as may be prescribed, whichever is higher, as may be directed by the Collector" shall be substituted.

Amendment of section 44A of Mah. XLI of 1966.

**4.** In section 44A of the said Code,—

(*a*) in sub-section (*3*), in clause (*a*), in sub-clause (*i*), for the words " such penalty not exceeding rupees ten thousand ; as the Collector may subject to the rules, if any, made in this behalf direct" the words "such penalty not exceeding rupees ten thousand or such amount as may be prescribed, whichever is higher, as the Collector may direct" shall be substituted ;

(*b*) in sub-section (*4*), in clause (*a*), for the portion beginning with the words " further penalty" and ending with the words " one hundred rupees", the following shall substituted, namely :—

"further penalty not exceeding five thousand rupees or such amount as may be prescribed, whichever is higher, for such contravention, and a daily penalty not exceeding one hundred rupees or such amount as may be prescribed, whichever is higher,".

Amendment of section 45 of Mah. XLI of 1966.

**5.** In section 45 of the said Code, in sub-section (*2*), for the portion beginning with the words " person a penalty" and ending with the words " thirty rupees", the following shall be substituted, namely :—

" person a penalty not exceeding three hundred rupees or such amount as may be prescribed, whichever is higher, for such contravention, and a further penalty not exceeding thirty rupees or such amount as may be prescribed, whichever is higher,".

Amendment of section 47A of Mah. XLI of 1966.

**6.** In section 47A of the said Code,—

(*a*) in sub-section (*2*), for the words "five times" the words "five times or such amount as may be prescribed, whichever is higher, of " shall be substituted ;

(*b*) in sub-section (*3*), for the words "five times" the words "five times or such amount as may be prescribed, whichever is higher, of " shall be substituted.

Amendment of section 49 of Mah. XLI of 1966.

**7.** In section 49 of the said Code,—

(*a*) in sub-section (*2*), in clause (*iv*), in sub-clause (*b*), for the words and figures "at a rate of 25 *paise* " the words " at the rate of twenty-five *paise* or such amount as may be prescribed, whichever is higher," shall be substituted ;

(*b*) in sub-section (*10*), for the words "not exceeding one hundred rupees" the words "not exceeding one hundred rupees or such amount as may be prescribed, whichever is higher," shall be substituted.

**8.** In section 50 of the said Code,— Amendment of section 50 of Mah. XLI of 1966.

(*a*) in sub-section (*2*),—

(*i*) for the words " a fine which shall not be less than five rupees but not more than one thousand rupees" the words " a fine which shall be one thousand rupees or such amount as may be prescribed, whichever is higher," shall be substituted ;

(*ii*) for the words " not exceeding two thousand rupees" the words "not exceeding two thousand rupees or such amount as may be prescribed, whichever is higher, " shall be substituted ;

(*iii*) for the words " fifty rupees " the words "fifty rupees or such amount as may be prescribed, whichever is higher," shall be substituted ;

(*b*) in sub-section (*4*),—

(*i*) for the words " twenty-five rupees" the words " twenty-five rupees or such amount as may be prescribed, whichever is higher" shall be substituted ;

(*ii*) for the words " fifty rupees" the words " fifty rupees or as may be prescribed, whichever is higher," shall be substituted.

**9.** In section 51 of the said Code, for the words " five times", at both the places where they occur, the words " five times or such times as may be prescribed, whichever is higher, of " shall be substituted. Amendment of section 51 of Mah. XLI of 1966.

**10.** In section 53 of the said Code, in sub-section (*3*), for the words " two times the assessment or rent for land" the words " two times the assessment or rent for land or such amount as may be prescribed, whichever is higher, " shall be substituted. Amendment of section 53 of Mah. XLI of 1966.

**11.** In section 70 of the said Code, in the proviso, for the words " one rupee only " the words " one rupee or such amount as may be prescribed, whichever is higher " shall be substituted. Amendment of section 70 of Mah. XLI of 1966.

**12.** In section 72 of the said Code, in sub-section (*3*), for the words "three times the assessment" the words " three times the assessment or such times the assessment as may be prescribed, whichever is higher " shall be substituted. Amendment of section 72 of Mah. XLI of 1966.

**13.** In section 110 of the said Code, in sub-section (*2*),— Amendment of section 110 of Mah. XLI of 1966.

(*a*) for the words " ten *paise* " the words " ten *paise* or such amount as may be prescribed, whichever is higher," shall be substituted ;

(*b*) for the words " five *paise* " the words " five *paise* or such amount as may be prescribed, whichever is higher," shall be substituted.

**14.** In section 129 of the said Code and the proviso thereto, for the words " one rupee " at both the places where they occur, the words " one rupee or such amount as may be prescribed, whichever is higher, " shall be substituted. Amendment of section 129 of Mah. XLI of 1966.

**15.** In section 174 of the said Code, for the words " twenty-five per cent. of the amount not so paid " the words " twenty-five per cent. of the amount not so paid or such amount as may be prescribed, whichever is higher " shall be substituted. Amendment of section 174 of Mah. XLI of 1966.

Amendment of section 229 of Mah. XLI of 1966.

**16.** In section 229 of the said Code, in clause (*c*), for the words " fifty rupees " the words " fifty rupees or such amount as may be prescribed, whichever is higher " shall be substituted.

Amendment of section 266 of Mah. XLI of 1966.

**17.** In section 266 of the said Code, in the proviso,—

(*a*) for the words " one rupee per annum" the words " one rupee per annum or such amount as may be prescribed, whichever is higher" shall be substituted ;

(*b*) for the words " thirty times the assessment" the words " thirty times the assessment or such amount as may be prescribed, whichever is higher" shall be substituted.

Amendment of section 267 of Mah. XLI of 1966.

**18.** In section 267 of the said Code, in sub-section (*2*), after the word and letter " Schedule F " the words " or of such higher amount as may be prescribed, whichever is higher " shall be added.

Amendment of section 273 of Mah. XLI of 1966.

**19.** In section 273 of the said Code,—

(*a*) after the word and letter " Schedule G " the words " or according to such higher amount as may be prescribed, whichever is higher" shall be inserted ;

(*b*) for the words " twenty-five *paise* " the words " twenty-five *paise* or such amount as may be prescribed, whichever is higher," shall be substituted.

Amendment of section 289 of Mah. XLI of 1966.

**20.** In section 289 of the said Code, for the words " five rupees" the words " five rupees or such amount as may be prescribed, whichever is higher," shall be substituted.

Amendment of section 291 of Mah. XLI of 1966.

**21.** In section 291 of the said Code, for the words " rupees ten in the whole" the words " rupees ten in the whole or such amount as may be prescribed, whichever is higher" shall be substituted.

Amendment of section 298 of Mah. XLI of 1966.

**22.** In section 298 of the said Code,—

(*a*) for the words " ten rupees " the words " ten rupees or such amount as may be prescribed, whichever is higher," shall be substituted ;

(*b*) for the words " one hundred " the words " one hundred or such amount as may be prescribed, whichever is higher" shall be substituted.

Amendment of section 324 of Mah. XLI of 1966.

**23.** In section 324 of the said Code,—

(*a*) for the words " one hundred rupees " the words " one hundred rupees or such amount as may be prescribed, whichever is higher" shall be substituted ;

(*b*) for the words " five hundred rupees " the words " five hundred rupees or such amount as may be prescribed, whichever is higher" shall be substituted.

**24.** In section 329 of the said Code, in sub-section (*2*), for the words " one thousand rupees " the words " one thousand rupees or such amount as may be prescribed, whichever is higher," shall be substituted. Amendment of section 329 of Mah. XLI of 1966.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.